| | | |
|---|---|---|
| | | मा.अध्यक्षांनी सदर विषयाबाबत सायकल खरेदीचा प्रस्ताव तयार करुन पुढील मंडळ बैठकीत ठेवण्याच्या सुचना दिल्या होत्या.<br><br>बांधकाम कामाचे ठिकाण हे शहरामध्ये किंबा शहराच्या बाहय भागामध्ये विखुरलेले असतात. बांधकामाच्या ठिकाणी वाहन जाण्याकरीता रस्त्यांची सुविधा नसते बांधकाम कामगारांना कामाकरीता त्यांच्या राहत्या ठिकाणापासून दूर दूर पर्यंत पायी जाण्याशिवाय पर्याय राहत नाही. बांधकाम कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी वेळेत आणि विना अडथळा पोहचता यावे याकरीता सायकल सारख्या माध्यमाची आवश्यकता आहे.<br><br>महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय दि. ०५.१२.२०१६ अन्वये राज्यातील विविध विभागांतर्गत द्यावयाचे लाभ लाभार्थ्यांना पुर्णपणे मिळेल आणि अनावश्यक गोष्टी टळू शकतील यासाठी DBT कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची गरज विचारात घेऊन शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तूरूपात अनुदान देण्यात येते त्या ठिकाणी वस्तू रूपात अनुदान देण्याऐवजी रोख रक्कमेच्या स्वरूपात अनुदान देण्यात यावे जेणेकरून विविध कल्याणकारी योजनामधून मिळणारे लाभ हे थेट लाभार्थ्यांना मिळण्याची शाश्वती राहील, निविदा प्रक्रियेतील अडथळे राहणार नाहीत, वित्तीय सहाय्य वेळेवर देणे शक्य होईल, लाभार्थ्यांना ठराविक व |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | विशिष्ट रक्कम मिळणार असल्याने तो आवश्यक असणा-या वस्तूची गुणवत्ता तपासून व भाव करून चांगली वस्तू खरेदी करून शकेल, स्थानिक उद्योग व्यवसायिकांना लाभ होईल, लाभ वाटपच्या पध्दतीत अधिक पारदर्शकता येईल व संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढ होईल या बाबी विचारात घेऊन त्या बाबत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्यातील शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था मंडळ, महामंडळे यांना जर कल्याणकारी योजनेंतर्गत कोणतेही वस्तू/ साधनसामुग्री द्यावयाची असल्यास त्यासाठी खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.<br>अ) संबंधित वस्तूबाबत वितरण योजना तयार करणे.<br>आ) वस्तू विकत घेण्यासाठी अनुदान ठरवणे<br>इ) वितरीत करावयाच्या वस्तूंचे परिमाण ठरविणे<br>ई) या योजनांतर्गत पात्रतेचे निकष ठरविण्यात यावे.<br>उ) पात्रतेप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.<br>ऊ) लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding)करणे.<br>ए) निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणाला मान्यता देवून त्यांना लेखी कळविणे.<br>ऐ) लाभार्थ्यांनी परिमाणाप्रमाणे (Specification) वस्तूंची खरेदी करणे. |

अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | आ) संबंधित यंत्रणेने लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करून पूणपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर योजनेंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे. वस्तूची शहानिशा कशा प्रकारे व ती करणे आवश्यक आहे काय याबाबत संबंधित विभागाने निर्णय घ्यावा<br>औ) लाभार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरूपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यात यावे.<br>राज्य शासनाचे उपरोक्त आदेश विचारात घेता प्रस्तावित सायकल खरेदीची रक्कम निश्चित करून तसा प्रस्ताव राज्य शासनास सादर करून मान्यतेअंती योजना राबविणे प्रस्तावित आहे.<br>यावर मा. सहसचिव, कामगार यांनी सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता कामगारांनी प्रथम सायकल स्वखर्चाने खरेदी करून सायकल खरेदी केल्याबाबती पावती व खरेदी केलेल्या सायकलसहित फोटो मंडळास सादर करण्याबाबत बांधकाम कामगारांना कळवावे.<br>याबाबत मा. अध्यक्ष यांनी असे सुचित केले की, बांधकाम कामगारांची आर्थिक स्थिती विचारात घेता बांधकाम कामगार सायकल खरेदी करू शकनार नाही, त्यामुळे कुपन पद्धतीचा वापर करण्यात यावा. |

(स्वाक्षरी)
अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | यावर मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी कामगारांना सदर योजनेबाबत लाभ देण्यासाठी मंडळाने योग्य ती किंमत ठरविण्यात यावी असे मत व्यक्त केले. याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, सायकलच्या किमतीबाबत संकेतस्थळांना भेट दिली असता Atlas Black Bicycle ची किंमत रु.४२२१/- तर Hercules Rocky RF २४ Hybrid Cycle ची किमत रु. ४१००/- एवढी असून याशिवाय शासकीय कर अदा करावे लागतील. याबाबत चर्चेअंती नोंदित बांधकाम कामगारांना सायकल खरेदीसाठी रु. ४५००/- एवढी रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी, असे ठरले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना सायकल खरेदीसाठी रु. ४५००/- एवढी रक्कम त्यांच्या बँक खात्यात DBT पद्धतीने जमा करण्यात यावी, याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करून शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ९. | **प्रत्येक जिल्हयात नोंदीत बांधकाम कामगारांच्या** | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०३.०९.२०१६ च्या बैठकीमध्ये व मा.मंत्री (कामगार) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कौशल्य वृध्दीकरण योजनेबाबत |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | पाल्यांसाठी कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेबाबत. | सविस्तर चर्चा होऊन Recognition of Prior Learning (RPL) for Construction workers या केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी करण्याबाबत मंडळाची मंजुरी घेण्यात आली होती. त्या अनुषंगाने दि.२७.०९.२०१६ रोजी च्या पत्रान्वये शासन मंजुरीस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.<br>उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने पत्र दि. २७.०२.२०१७ अन्वये सदर योजनेची अंमल बजावणी करण्यासाठी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या खाली नमूद प्रशिक्षण संस्थांना तसेच प्रशिक्षणाची नियतकालीक तपासणी करण्यासाठी केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या तपासणी संस्थापैकी (ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीज) खालील संस्थांना महसुल विभाग निहाय खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आले आहे. |

| अ.क्र. | विभागाचे नांव | ट्रेनिंग प्रोव्हायडर्स | असेसींग बॉडीज |
|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | लेबरनेट सर्विसेस इंडिया प्रा.लि., बंगलोर | इंडिया स्किल्स न्यु दिल्ली. |
| २. | पुणे विभाग | आय एल अॅन्ड एफ एस स्किल्स, नोएडा | इंडिया स्किल्स, न्यु दिल्ली |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | नाशिक विभाग | जी अॅन्ड जी स्किल्स डेव्हलपर्स प्रा.लि., पंचकुला | एकेजी, चंदीगड |
| ४. | नागपूर विभाग | सुशिल बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर | शिक्षा भारती न्यु दिल्ली |
| ५. | औरंगाबाद विभाग | भास्कर फाऊंडेशन, दिल्ली | वर्च्युअल एज्युकेशन ट्रस्ट |

सदर संस्थेमार्फत नोंदीत बांधकाम कामगारांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तथापि, त्यांच्या पाल्यांकरीता सद्यसिथतीत कौशल्य विकासाचे केंद्र अस्तित्वात नाही. बांधकाम कामागारांच्या पाल्यांना शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते त्यामुळे बरेच पाल्ये शिक्षणापासून वंचित राहतात. बांधकाम कामगारांच्या पाल्यांना शिक्षणासोबत कौशल्य विकासाचे प्राशिक्षण दिल्यास सदर पाल्य बांधकाम कामगार न राहता अन्य उद्योगामध्ये काम करून त्यांचे जीवनमान उंचविण्यास मदत होईल तथापि, १४ वर्षे वयाखालील पाल्यास शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षण देणे सक्तीचे आहे. तसेच, १८ ते ६० वयादरम्यान असलेले बांधकाम कामगार मंडळाकडे नोंदीत होऊन उपरोक्त RPL योजनेंतर्गत कौशल्य विकासाशी

| | | |
|---|---|---|
| | | लाभ घेऊ शकतात. त्यामुळे उर्वरित १५ ते १७ या वयोगटातील कामगारांची पाल्यांची संख्या विचारात घेऊन त्यांचेसाठी कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेबाबत विचार करावा लागेल तसेच केंद्र शासनाच्या दि.०७.०६.२०१६ रोजी अधिनियमाच्या कलम ६० अंतर्गत प्रापत निर्देशानुसार शाळा इमारत, दवाखाने, प्रशिक्षण केंद्र, लेबर शेड कम नाईट शेल्टर्स, प्रतिक्षाकक्ष, हॉस्टेल्य इ. बांधकामास मनाई करण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेऊन कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेबाबत निर्णय घ्यावा लागेल, असे मंडळ सचिव म्हणाले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: दिनांक १६.०३.२०१७ पासून कौशल्य विकास वृद्धीकरण (RPL) ही योजना सुरू असल्याने प्रत्येक जिल्हयात नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेबाबतची योजना सुरु केल्यास द्वीरुक्ती होईल त्यामुळे सदर योजना लागू करण्यात येवू नये, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १०. | **मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या कार्यन्वयांकरीता शासन आदेशानुसार** | याबाबत मंडळ सचिव असे म्हणाले की, मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मे. केपीएजी यांना योजनांची अंमलबजावणी करणेसाठी बाह्य यंत्रणेची/ सल्लागार कंपनीची (Consultant) नियुक्ती करणे, मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांसाठी जनजागृती मोहीम राबविणे, उपकर जमा करण्यासाठी प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **नियुक्त केलेल्या KPMG या कंपनीच्या मनुष्यबळ नियुक्तीस व कामाच्या स्वरूपास मान्यता देणेबाबत** | करणे. बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देणे. बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी शाळा बांधणेबाबत मंडळामार्फत शासनमान्य KPMG यांची आय.टी. कंसल्टंटची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था (NGO) व या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या इतर संस्था यांना नियुक्त करण्यात यावे असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आलेले आहेत.<br>मंडळाच्या उपरोक्त ठरावानूसार दि.२१.०३.२०१७ च्या पत्रान्वये ०१ Senior Consultant व ०१ Consultant यांची दि. २२.०३.२०१७ पासून पुढील ०३ महिन्याकरीता नियुक्ती करण्यात आली होती. KPMG ची नियुक्ती दि. ३०.०६.२०१७ रोजी संपुष्टात येईल.<br>मंडळाच्या दि. २८.०२.२०१७ च्या बैठकीतील ठरावानूसार प्रस्तावित विविध योजनांचे RFP Doucemnet तयार करण्याबाबतत KPMG या संस्थेस दि. १९.०४.२०१७ पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर पत्रास अनूसरून KPMG यांनी त्यांच्या दि. २३. ०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त ०८ मनुष्यबळाची मागणी केलेली आहे.<br>KPMG या संस्थेने नेमणूकीनंतर जनजागरण सप्ताह साजरा करण्यासाठी आवश्यक EOI चे प्रारूप तयार करणे, EOI मागवणे त्याची छाननी करणे व पात्र संस्थेची निवड करण्याच्या कामात मदत केलेली आहे. सद्यस्थितीत KPMG कडून मंडळाच्या कामकाजाकरीता एकात्मिक संगणकीय |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | प्रणली बाहय यंत्रणेव्दारे विकसित करण्यासाठी RFP documents बनवण्याचे काम प्रगतीपथावर आहे.<br><br>उपरोक्त कामाशिवाय उपकर जमा करण्यासाठी प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping करणे, बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची (मोबाईल डे केअर सिस्टम) सुविधा उपलब्ध करून देणे, बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणे या योजनांचे RFP documents तयार करणे, ई-निवीदा मागविणे, निवीदाची छाननी करणे व अनुषंगिक सर्व कामे KPMG कडून करून घेणे अपेक्षीत आहे. याशिवाय उद्योग ऊर्जा व कामागार विभागाचे पत्र क्र. क्र. काआआ-२०१३/प्र.क्र.२३३/काम-८ दिनांक १९.०५.२०१७ अन्वये मंडळांतर्गत बाहय यंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्यासंदर्भात Consultant कडून नवीन RFP तयार करून नव्याने निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी व निविदा स्वीकारण्याबाबत अंतीम मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा असे निर्देश प्राप्त झाले आहे त्यानुसार सदर कामाच्या निविदा मागविण्यासाठी RFP Document बनविण्यासाठी KPMG यांना कळविण्याचेही प्रस्तावित आहे. सदर कामाकरीता KPMG कडून खालील प्रमाणे मनुष्यबळाची नेमणूक करणे प्रस्तावित आहे. |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| अ.क्र | कन्संलटन्ट | उपलब्ध मनुष्यबळ | अतिरिक्त मनुष्यबळ | एकुण मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|
| १. | प्रिंसिपल कन्संलटन्ट | -- | ०१ | ०१ |
| २. | सिनिअर कन्संलटन्ट | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | कन्संलटन्ट | ०१ | ०२ | ०३ |
| | **एकूण** | **०२** | **०४** | **०६** |

तथापि, मे. KPMG कडील प्रस्तावित अतिरिक्त मनुष्यबळ नेमणुकीस व सर्व कन्सल्टंट ची नेमणूक आदेशाच्या तारखेपासून ०६ महिन्याकरीता करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करावी असे प्रस्तावित आहे.

यावर सर्व उपस्थितांनी चर्चा करून खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| अ.क्र | कन्संलटन्ट | अतिरिक्त मनुष्यबळ | एकूण खर्च (लाखात) |
|---|---|---|---|
| १. | प्रिंसिपल कन्संलटन्ट | ०१ X २.७५ | २.७५ |
| २. | सिनिअर कन्संलटन्ट | ०२ X २.२० | ४.४० |
| ३. | कन्संलटन्ट | ०३ X १.६० | ४.८० |
| | **एकूण** | **०६** | **११.९५** |

त्याचप्रमाणे दिनांक ०१.०७.२०१४ रोजीचा माहिती व तंत्रज्ञान विभागाचा शासन निर्णयाची मुदत दिनांक ३०.०६.२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने सदर शासन निर्णयास मुदतवाढ मिळाल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशीही चर्चा करण्यात आली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या कार्यन्वयांकरीता शासन आदेशानुसार नियुक्त केलेल्या KPMG या कंपनीच्या एकूण ६ मनुष्यबळ नियुक्तीस, प्रस्तावित कामे सोपविण्यास व दरमहा सरासरी रु. १२ लक्ष (अधिक देय कर) एवढया खर्चास तसेच शासनाच्या दिनांक १९.०५.२०१७ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार बाहययंत्रणेमार्फत्**



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | **मनुष्यबळ पुरवठयासाठी RFP Document तयार करण्याचे कामही सदर संस्थेस सोपविण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासन निर्णयातील मुदत व वेळोवेळी प्राप्त होणारी मुदतवाढ विचारात घेऊन नेमणूकीचे आदेश देण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| ११. | **मंडळाच्या मुख्यालयाकरीता कौशल्य विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील जागेमधून भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून घेणेबाबत.** | यावाबत मंडळ सचिव यांन असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मुख्यालय सद्य:स्थितीत कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक , सी २० , बांन्द्रा –कुर्ला संकुल, बांन्द्रा (पुर्व), मुंबई ४०० ०५१ येथे कार्यरत आहे. कामगार भवन मध्ये मंडळाकरीता उपलब्ध असलेली जागा अपुरी असल्यामुळे मंडळाचे मा. अध्यक्ष, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकारी यांचे दालनाकरीता पुरेशी जागा उपलब्ध होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे उपलब्ध कर्मचाऱ्यांना बसण्याकरीताही पुरेशी जागा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालयाकरीता स्वतंत्र जागा असणे आवश्यक आहे. मंडळाच्या मुख्यालयासाठी भाडेत्तवावर जागा घेणेबाबतचा ठराव मंडळाच्या दिनांक १६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.<br>तसेच, दिनांक १५.०५.२०१७ रोजी मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली परिषद |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | सभागृह, मंत्रालय येथे पार पडलेल्या बैठकीत मंडळाच्या मुख्यालयाकरीता जागेसंबंधी झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडे(MSSDS) मेकर चेंबर्स, दक्षिण मुंबई येथे १५००० चौ. फुट एवढी जागा उपलब्ध असून त्यामधून मंडळाच्या मागणीनुसार मुख्यालयाकरीता जागा उपलब्ध करून देता येईल, असे निर्देश मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी दिले. मंडळाच्या दि. २५.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये, मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या उपरोक्त निर्देशानुसार मंडळाच्या मुख्यालयाकरीता अंदाजे ६१७० चौ. फुट एवढी जागा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई शहर यांच्या मंजूर दरानूसार उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.<br><br>तरी, मंडळाच्या मुख्यालयाकरीता महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभाग (MSSDS) मेकर चेंबर, दक्षिण मुबई येथे अंदाजे ६१७० चौ. फुट एवढी जागा घेणेबाबत व सर्वाजनिक बांधकाम विभागाच्या मंजूर दराने भाडे अदा करण्यास मंडळाच्या बैठकीत ठराव घेण्यास्तव प्रस्तावित आहे.<br><br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव: मंडळाच्या मुख्यालयाकरीता कौशल्य विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील जागेमधून भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून घेणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २५.०५.२०१७** |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | **रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| १२. | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामागार कल्याणकारी मंडळाचे संकेतस्थळ (Web site) विकसीत करण्यास मान्यता देणेबाबत** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शना आणून दिले की, सद्यास्थितीत मंडळाकडे स्वतंत्र संकेतस्थळ उपलब्ध नाही. मंडळाची माहिती काही प्रमाणात www.mahakamgar.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तथापि, मंडळामार्फत राबवण्यिात येणा-या विविध कल्याणकारी योजनांची माहिती, नोंदणी अर्जाचा नमुना, योजनेच्या लाभाच्या अर्जाचा नमुना, अधिनियमाची प्रत, शासन अध्यादेश, शासन आदेश, परिपत्रके, , मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्तांत इ. माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करणे जरूरीचे आहे. मंडळाचे संकेतस्थळ उपलब्ध नसल्याने अनावश्यक माहिती अधिकाराचे अर्ज या कार्यालयास प्राप्त होतात. एकच एक माहिती विविध व्यकतीकडून माहिती अधिकारांतर्गत विचारणा करण्यात येते. त्यामुळे सदरची माहिती पुरविण्यास मनुष्यबळ खर्ची पडते. सदरची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध केल्याने मंडळाकडे प्राप्त होणार माहितीच्या अधिकार अर्जाचे प्रमाण कमी होईल. त्याचप्रमाणे नागरिकांची सनदी संदर्भातील माहिती/ मुद्दे प्रसिध्द करणे करणे शक्य होईल. तसेच, सदर संकेतस्थळाच्या माध्यमातून मंडळाच्या कल्याणकारी योजनांच्या माहितीची जनजागृती करणे शक्य होईल.<br><br>त्या अनुषंगाने खाजगी संस्थामार्फत दर पत्रके मागवून मंडळाचे संकेतस्थळ विकसीत |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | करण्याबाबत मंडळाची मान्यता घेणे प्रस्तावित आहे.<br>यावर मा. संचालक, लेखा व कोषागारे यांनी मंडळाचे संकेतस्थळ (Web site) मंडळाचे IT Consultan मे. KPMG यांच्याकडून विकसित करून घेण्यात यावी, असे सुचविले त्यासाठी बेगळया संस्थेची निवड करण्यात येवू नये असे मत मा. सहसचिव, लेखा व कोषागारे यांनी व्यक्त केले त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामागार कल्याणकारी मंडळाचे संकेतस्थळ (Web site) विकसीत करण्याबाबत मंडळाचे IT Consultan मे. KPMG यांचे सल्ल्यानुसार खाजगी संस्थांकडून दरपत्रके मागवून संकेतस्थळ विकसित करून घेण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १३. | **मंडळामार्फत सन २०१६-१७ या वर्षातील नोंदीत बांधकाम कामगार व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ** | याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांना असे सांगितले की, इमारत व इतर बांधकम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कलम १८ (१) नुसार महाराष्ट्र अधिसूचना दि.०४.०८.२००७ अन्वये प्रथमत: ५ शासकीय सदस्यांची नियुक्ती मंडळावर करण्यात आली होती. तदनंतर दिनांक १ मे २०११ व २८ मे २०१५ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे परिपूर्ण त्रिपक्षीय मंडळाचीय पुनर्रचना |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | वाटपाचा तपशील सादर करणेबाबत | करण्यात आलेली आहे. सन २०११-१२ पासून ते २०१६-१७ पर्यंत नोंदीत व नोंदीत जिवीत बांधकाम कामगार, उपकर जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे. |

अ) वर्ष निहाय नोंदीत बांधकाम कामगार संख्येचा तपशील

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | वर्षनिहाय कामगारांची नोंदणी संख्या | वर्ष अखेर कामगारांची नोंदणी संख्या |
|---|---|---|---|
| १. | २०११-१२ | ३३९७४ | ३३७९४ |
| २. | २०१२-१३ | ८२४०३ | ११६१९७ |
| ३. | २०१३-१४ | ८२६६७ | १९८८६४ |
| ४. | २०१४-१५ | १७५५७९ | ३७४४४३ |
| ५. | २०१५-१६ | १२१२२५ | ४९५६६८ |
| ६. | २०१६-१७ | ९७७४५ | ५९३४१३ |

ब) विभाग निहाय नोंदीत बांधकाम कामगार व जिवीत नोंदीत बांधकाम कामगार संख्येचा तपशील

| अ.क्र. | विभागाचे नाव | नोंदीत कामगार संख्या | जिवीत नोंदीत कामगार संख्या |
|---|---|---|---|
| १. | मुंबई (कोकण) | ८७५९६ | २४००२ |



अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| २. | पुणे | १९६६४५ | ७४७४६ |
| ३. | नागपूर | ९५२०८ | ६५७८६ |
| ४. | नाशिक | ६९३५८ | १७८६६ |
| ५. | औरंगाबाद | १४४६०६ | ११६४६२ |
| | **एकूण** | **५९३४१३** | **२९८८६२** |

क) मंडळचा वर्ष निहाय उपकर जमा रक्कमेचा तपशील

| **अ.क्र.** | **आर्थिक वर्ष** | **जमा उपकर निधी (आकडे कोटीत)** |
|---|---|---|
| १. | २००७-०८ | ०.७७ |
| २. | २००८-०९ | ०.६० |
| ३. | २००९-१० | ९.४८ |
| ४. | २०१०-११ | ८९.०१ |
| ५. | २०११-१२ | ४२५.९७ |
| ६. | २०१२-१३ | ७७७.६९ |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| ७. | २०१३-१४ | ७८८.६० |
| ८. | २०१४-१५ | ८०२.११ |
| ९. | २०१५-१६ | १११०.०५ |
| १०. | २०१६-१७ | १०६९.८४ |
| | **एकूण** | **५०७४.१६** |

ड) मंडळाचा वर्षनिहाय खर्चाचा तपशील

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | योजना व प्रशासकीय बाबीवरील खर्च (रू. कोटीत) |
|---|---|---|
| १. | २००७-०८ | -- |
| २. | २००८-०९ | -- |
| ३. | २००९-१० | -- |
| ४. | २०१०-११ | -- |
| ५. | २०११-१२ | ०.०६२ |
| ६. | २०१२-१३ | ९.९६ |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| ७. | २०१३-१४ | ५३.३३ |
| ८. | २०१४-१५ | ११४.५८ |
| ९. | २०१५-१६ | ५६.२८ |
| १०. | २०१६-१७ | २१.२९ |
| | **एकूण** | **२५५.४९** |

सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात मंडळाकडे उपकरांतर्गत एकूण १०६९.८४ कोटी इतका निधी जमा झालेला आहे. मंडळाकडे सन २०१६-१७ मध्ये ९७७६५ बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे (विभाग निहाय तपशील प्रपत्र अ) व मंडळामार्फत राबविण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजनेंतर्गत ४८५८२ बांधकाम कामगारांना लाभ देण्यात आलेला असून सदर लाभापोटी रक्कम रू २०.३१ कोटी एवढा खर्च झालेला आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: सन २०११-१२ ते २०१६-१७ पर्यंतचा वर्ष निहाय नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या, जिवीत नोंदीत बांधकाम कामगार संख्या, मंडळाचा वर्ष निहाय उपकर जमा रक्कम,**



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | **मंडळाचा वर्षनिहाय खर्च व मंडळामार्फत सन २०१६-१७ या वर्षातील नोंदीत बांधकाम कामगार व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाचा सादर केलेल्या तपशीलाची नोंद घेऊन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| १४. | **मंडळाची सन २०१२-१३ व २०१३-१४ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक अहवालास मान्यता देणेबाबत.** | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील नियम २७ अन्वये मंडळाच्या आर्थिक वर्षातील कामकाजाचे लेखा व लेखापरीक्षण अहवाल प्रत्येक वर्षी विधीमंडळात ठेवण्यासाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.<br>त्यानुसार मंडळाच्या दि. ०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. ०१ अन्वये मंडळाच्या सन २००७-०८ ते २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या लेखा/ लेखापरिक्षण अहवाल व वार्षिक अहवालास मान्यता प्रदान करण्यात आली होती व सदर अहवाल मंडळाच्या दि. ०५.०१.२०१७ च्या पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. शासन मान्यतेनंतर सदर अहवाल विधीमंडळात ठेवण्यासाठी दि. ३०.०३.२०१७ च्या पत्रान्वये छापील प्रतीसह शासनास सादर करण्यात आले आहे.<br>मंडळाचे सन २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल लेखापरिक्षण अहवालासह विधीमंडळास सादर करण्यासाठी शासनाकडे इंग्रजी भाषेमध्ये दि.३०.०३.२०१७ रोजी सादर करण्यात आलेले होते. परंतु दि. ०३.०४.२०१७ रोजी |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | शासनामार्फत सदरचे अहवाल मराठी भाषेत उपलब्ध करून देण्याबाबत दूरध्वनीद्वारे व दि. ११.०५.२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानूसार सदरच्या अहवालांचे भाषा संचालनालयाकडून मराठीमध्ये भाषांतर करून घेण्यात आलेले आहे व ते मंडळाच्या दि.०३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेले आहे.<br>मंडळाच्या सनदी लेखापालानी सन २०१२-१३ व २०१३-१४ या कालावधीचे लेखे सादर केलेले आहेत व त्यानुसार मंडळाच्या सदर आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करण्यात आले आहेत. सदर अहवाल विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात ठेवण्यासाठी शासनास मान्यतेसाठी सादर करण्यासाठी मंडळाने मान्यता प्रदान करण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>ठराव: **मंडळाची सन २०१२-१३ व २०१३-१४ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक लेखे सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| १५. | **मंडळाच्या अतिरिक्त निधीचे गुंतवणूकीकरीता उपसमितीने मंजूर केलेल्या गुंतवणूकीच्या** | मंडळ सचिव यांनी असे सांगितले की, शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.उ. दिनांक २७.१०.२०१५ नुसार राज्य सार्वजनिक उपक्रमातील अतिरिक्त निधीची गुंतवणूक शेडयुल्ड बँके पैकी स्टेट बँक व त्याची असोसिएट बँक, राष्ट्रीयकृत बँक व किमान |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | सुधारित निकषास मान्यता देणे. | नक्त मत्ता (Net Worth) ४००० कोटी असलेल्या बँकेत करता येते. तसेच बँकेच्या नक्त मुल्याच्या १५% पेक्षा अधिक निधी एका बँकेत गुंतवू नये व गुंतवणुकीबाबत इतर मार्गदर्शक तत्वे व सूचना सदर शासन निर्णयात नमूद आहेत.<br>दि. ०३.०९.०२०१६ रोजीच्या मंडळाच्या बैठकीमध्ये वित्त विभागाचा दिनांक २७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने मान्यता दिलेल्या खाजगी बँकांमध्ये मंडळास गुंतवणूक करता येईल, असा ठराव संमत करण्यात आला. त्याप्रमाणे वित्त विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयानुसार राष्ट्रीयकृत बँकांबरोबर भारतीय रिझर्व्ह बँकेंच्या यादीतील व्यापारी शेडयुल्ड बँकांना दि. ०४.०१.२०१७ रोजीच्या मुदत ठेव गुंतवणुकीच्या बैठकीसाठी बोलविण्यात आले. व जास्तीचा व्याजदर प्राप्त झालेल्या खाजगी शेडयुल्ड बँकांत गुंतवणुक करण्यात आली.<br>दि. ०२.०५.२०१७ रोजीच्या मुदत ठेव गुंतवणूकीच्या बैठकीमध्ये गुंतवणुकीबाबत उपसमितीकडून खालीलप्रमाणे निकष ठरवण्यात आले.<br>१. राष्ट्रीयकृत बँक व खाजगी शेडयुल्ड बँकेत गुंतवणूक करताना ६०:४० या प्रमाणात करावी.<br>२. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी शेडयुल्ड बॅकेतील गुंतवणूक एकूण रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये. |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ३. सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा खाजगी शेडयुल्ड बँकेमध्ये एका वेळची गुंतवणूक रु. १००० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>४. मंडळाची गुंतवणुक करतांना उपरोक्त ६०:४० या प्रमाणात गुंतवणुकीस राष्ट्रीयकृत/खाजगी शेडयुल्ड बँकेंकडून प्रतिसाद न मिळाल्यास किंवा रू. १००० कोटी पेक्षा जास्त गुंतवणुक एकाच बँकेत होणार असल्यास त्यादिवशीची प्रस्तावित गुंतवणुक स्थगित ठेवावी व तदनंतरच्या बैठकीत विचारात घ्यावी.<br>दि.०३.०५.२०१७ रोजीच्या मंडळाच्या ४० व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ३ अन्वये उपसमितीने गुंतवणुकीसाठी निश्चित केलेल्या उपरोक्त चार निकषाला मान्यता प्रदान करण्यात आली होती.<br>उपसमितीने दि. ०२.०५.२०१७ रोजी निश्चित केलेले गुंतवणूकीच्या निकषाबाबत फेर विचार करण्यासाठी मा. संचालक लेखा व कोषागारे यांनी मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांना केलेल्या विनंतीनुसार दि. १७.०५.२०१७ रोजी मा. मंत्री महोदय, (कामगार) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सदर बैठकीमध्ये मा. संचालक लेखा व कोषागारे यांनी असे सुचित केले की, शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.उ. दिनांक २७.१०.२०१५ मधील तरतूदीनुसार |



(सही)
**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | सुरक्षिततेच्या कारणास्तव (Risk Distribution) खाजगी शेडयुल्ड बँकांऐवजी राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणूक करणे योग्य राहील. सदर प्रस्तावावर उपसमितीने सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे मंडळाच्या गुंतवणूकीचे सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे.<br>१. मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक केवळ राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात यावी.<br>२. कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेंतील एकूण गुंतवणूक रु. ५०० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>३. कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेंमध्ये एका वेळची गुंतवणूक रु. ५०० कोटीपेक्षा जास्त असू नये.<br>उपरोक्त सुधारित निकषास मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br>**ठराव: मंडळाच्या अतिरिक्त निधीचे गुंतवणूकीकरीता उपसमितीने दिनांक १७.०५.२०१७ रोजी मंजूर केलेल्या गुंतवणूकीच्या सुधारित निकषास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| १६. | **कामगार आयुक्तालयाचे मुख्यालय, विभागीय** | दि.३०.०७.२०१४ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत कामगार आयुक्त कार्यालयातील जे कर्मचारी मंडळासाठी काम करतात त्यांना १० टक्के भत्ता मंडळाच्या प्रशासकीय खर्चांतर्गत देण्यात यावा असा |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **कार्यालये,जिल्हा कार्यालय स्तरावर मंडळाचे अतिरिक्त स्वरूपात कामकाज करणा-या अधिकारी/कर्मचा-यांना मंडळामार्फत अतिरिक्त मोबदला देणेबाबत** | ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला होता. तथापि, त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.<br>सद्यस्थितीत मंडळाच्या आस्थापनेवर ५६ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. सुधारित २८७ पदाचा आकृतीबंधास शासनमान्यता प्रस्तावित आहे. तथापि, मंडळाचे सेवाप्रवेश नियम अद्याप मंजूर नसल्याने मंडळाच्या आस्थापनेवर अधिकारी/ कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली नाही. मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नोंदणीचे नुतनीकरण, कल्याणाकारी योजनांचे लाभ वाटप, कौशल्य विकास प्रशिक्षण इ. सर्व कामे कामगार आयुक्तलयाचे मुख्यालय स्तरावरील तसेच विभागीय व जिल्हा स्तरावर मंडळाचे कामकाज पाहणा-या अप्पर कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त, सरकारी कामगार व कर्मचारी यांचेमार्फत करण्यात येते. सदर अधिकारी/ कर्मचाऱ्यांना त्यांचे मूळ कामकाज सांभाळून करून अतिरिक्त स्वरूपात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे कामकाज पहावे लागते.<br>त्याअनुषंगाने प्रस्तावित करण्यात येते की, कामगार आयुक्तलयाचे मुख्यालय, विभागीय कार्यालय स्तरावर मंडळाचे अतिरिक्त स्वरूपात कामकाज करणा-या अप्पर कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त, सरकारी कामगार अधिकारी व अप्पर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त यांच्या लेखी आदेशान्वये मंडळाचा अतिरिक्त कारभार सोपविलेल्या |

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | कर्मचाऱ्यांना त्यांचे मूळ वेतनाच्या (ग्रेड पे सह) १०% एवढा अतिरिक्त मेहनताना मंजूर करण्यास मंडळाची मान्यता प्रस्तावित आहे.<br>सदर प्रस्तावास माहिती सादर करताना मंडळाच्या माजी सचिव श्रीमती भोसले यांनी असे सादर केले की, सदर प्रस्तावास दिनांक १६.१०.२०१५ रोजी शासनाने वित्त विभागाच्या दिनांक २७.१२.२०११ च्या शासन निर्णयानुसार मंडळाच्या कामाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना नियमानुसार अतिरिक्त कार्यभाराची विशेष वेतन अदा करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे<br>क्षेत्रिय स्तरावर मंडळाचा अतिरिक्त कार्यभार सोपविलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची यादी प्राप्त करून मागणीप्रमाणे प्रशासकीय खर्चांतर्गत निधी मुख्यालय स्तरावरून वितरीत करण्यात येईल.<br>**ठराव: कामगार आयुक्तालयाचे मुख्यालय, विभागीय कार्यालये, जिल्हा कार्यालय स्तरावर मंडळाचे अतिरिक्त स्वरूपात कामकाज करणा-या अधिकारी/कर्मचा-यांना मंडळामार्फत दिनांक १६.१०.२०१५ रोजीच्या शासनमान्यतेनुसार अतिरिक्त मोबदला देण्यात यावा, असा ठराव सर्वानुते घेण्यात आला.** |
| **१७** | **मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी व** | यावर मंडळ सचिव योनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, मंडळातील |



**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | **विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाकरीता नोंदित कामगार संघटनांचे सहकार्य घेणेबाबत** | बांधकाम कामगारांची नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वाटपाकरीता कामगार संघटनाचे सहकार्य घेणेबाबत अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना, लातूर व अन्य संघटनांमार्फत प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.<br><br>मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१८.०१.२०१० रोजीच्या आदेशात मंडळाच्या योजनांच्या लाभाचे अर्ज संघटनेकडून दाखल करण्याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत- Registered trade unions, Legal service Authorities and NGOs are to be encouraged to assist the workers to submit applications for registration and for seeking benefits.<br><br>मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेश व संघटनाची मागणी विचारात घेता असे प्रस्तावित करण्यात येते की, संघटनेच्या प्रतिनिधीकडून बांधकाम कामगारांच्या नोंदणी/ नुतनीकरण व लाभाचे वाटप इ. बाबत खालीप्रमाणे सहाय्य घ्यावे.<br>१. नोंदणी करीता विहीत नमुन्यात परिपूर्ण अर्ज तयार करणे.<br>२. नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे.<br>३. नोंदणी अर्ज जिल्हा कार्यालयांना सादर करणे.<br>४. नुतनीकरण करण्याकरीता परिपूर्ण अर्ज जिल्हा कार्यालयांना सादर करणे. |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | ५. मंडळाच्या योजनेचे लाभ घेण्याकरीता विहीत नमुन्यातील परिपूर्ण अर्ज जिल्हा कार्यालयांना सादर करणे.<br>संघटनामार्फत प्राप्त नोंदणी अर्ज, नुतनीकरण अर्ज व लाभाचे अर्ज जिल्हा कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाची सखोल छाननी करून छाननीमध्ये सदरचे अर्ज परिपूर्ण व आवश्यक कागदपत्रांसह पात्र ठरल्यास, संबंधित कामगारांना भेटीची वेळ निश्चित करून सक्षम अधिका-यांच्या सक्षम पडताळणीसाठी बोलविण्यात यावे. पडताळणीअंती सर्व बाबींची खात्री झाल्यास बांधकाम कामगारांची नोंदणी करून त्यांना त्वरीत ओळखपत्र वितरीत करण्यात यावेत. तसेच, त्यांनी मागणी केलेल्या लाभाचे अर्ज परिपूर्ण व पात्र असल्यास त्यांना देय आर्थिक लाभ DBT पध्दतीने त्यांच्या बँक खात्यावर परस्पर जमा करण्यात यावे. असा प्रस्ताव शासनास दि.२९.०५.२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे. यास मंडळाची मान्यता प्रस्तावित आहे.<br>**ठराव: मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाकरीता नोंदित कामगार संघटनांचे सहकार्य घेण्याबाबत शासनास दि.२९.०५.२०१७ रोजी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली व शासन स्तरावरुन मान्यता प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात यावी असेही ठरले.** |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| १६. | आयत्या वेळचे विषय. | **विषय क्र.१: मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी भाडेतत्वावर घरकुल योजना समितीवर आर्किटेक्टची नियुक्ती करणेबाबत**<br>मंडळाच्या दि.२८.०२.२०१६ रोजीच्या बैठकीत मुख्य वस्तू विशारद व नियोजन प्राधिकारी, म्हाडा यांना पॅनलवर असलेल्या एका आर्किटेक्टची सदर समितीमध्ये कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्याकरीता त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आर्किटेक्टची यादी पाठविण्याबाबत पत्र व्यवहार करण्यात आलेला होता त्यानुसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ म्हाडा यांनी समंत्रक वास्तुशास्त्रज्ञांची पाठविलेल्या यादी नुसार मे. शेटये यांना रू.१०,०००/- प्रति महिना आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती.<br>मंडळाच्या ठरावानुसार आर्किटेक्टच्या नियुक्तीस त्यांची सहमती प्राप्त करून मे. शेटये यांची नेमणूक करण्यात आली होती. मे. शेटये यांनी म्हाडा, सिडको, एमएमआरडीए व अन्य संस्थाकडून माहिती प्राप्त करून बांधकाम कामगारांकरीता भाडेतत्तवर घरे उपलब्ध करून देण्याबाबतच्या योजनेचा आराखडा सादर करण्याबाबत वारंवार पाठपुरावा करून त्यांनी अदयापपावेतो तसा आराखडा सादर केलेला नाही याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी त्यांच्या कामकाजावर तीव्र नापसंती व्यक्त केली. त्यामुळे त्यांची नेमणूक रदद करून त्यांच्याकडे सोपविलेले काम म्हाडाच्या पॅनलवरील अन्य वास्तूविशारद यांचेकडून करून घेणे योग्य राहील, असे प्रस्तावित आहे. |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | म्हाडाच्या पॅनलवरील अन्य वास्तूविशारदापैकी इच्छुक वास्तूविशारदाची निवड करून त्यांची नेमणूक करावयाच्या प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.<br>**ठराव: मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी भाडेतत्वावर घरकुल योजनेकरीता यापुर्वी नियुक्त मे. शेटये आर्किटेक्ट यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी व अन्य आर्किटेक्टच्या नियुक्तीची कारवाई तुर्तास स्थगित ठेवण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.**<br><br>**विषय क्र.२: सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.**<br>मंडळाच्याआस्थापनेवर ५६ पदे नेमणूकीकरीता दि.०३.१०.२०१२ व दि.०४.१०.२०१२ रोजी शासन मान्यता प्राप्त झालेली आहे. मंडळाचा २८७ पदांचा सुधारित आकृतीबंधही शासनमान्यतेस सादर करण्यात आलेला आहे. सुधारित आकृतीबंधास अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही व मंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सेवा प्रवेश नियम मंजूर नसल्यामुळे शासनाने यापूर्वीच मंजूर केलेले ५६ पदे सुध्दा भरता आलेली नाहीत. मंडळाच्या मुख्यालयात कामगार आयुक्त कार्यालयाकडून ०४ कनिष्ठ लिपीक व ब्रिस्क इंडिया प्रा.लि. यांचेकडून ०२ डाटा एंट्री ऑपरेटर, ०४ लेखाकार अशी पदे भरलेली आहेत.<br>सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी व लेखाधिकारी वगळता अन्य अधिकाऱ्यांची पदे |



अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | भरलेली नसल्यामुळे दैनंदिन कामकाजात अडचणी येत आहे. मंडळाच्या आस्थापनेवरील नियमित पदे भरेपर्यंत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.०८.०१.२०१६ व दिनांक १७.१२.२०१६ नुसार आवश्यक सेवांसाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे एम्पॅनलमेंट करून विवक्षित कामासाठी त्यांच्या सेवा वापरण्याची तरतूद आहे.<br><br>सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त आदेशानुसार ०४ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे पॅनल तयार करण्यास उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार पारिश्रमिकाची रक्कम अदा करण्यास मंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.<br>**ठराव: सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक दि.०८.०१.२०१६ व दिनांक १७.१२.२०१६ अन्वये ४ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सेवा करार पद्धतीने नियुकती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |



**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | **विषय क्र.३: सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणाकरीता (Statutory Audit) सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेबाबत.**<br><br>मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१५ च्या ठरावानुसार बाहययंत्रणेद्वारे मंडळाचे वैधानिक लेखापरिक्षण (Statutory Audit) करण्यासाठी ३ दरपत्रक मागवून सर्वात कमी दर असलेल्या श्री.टी.पी.डबले ॲण्ड कं., नागपूर यांची रु. २,७५,०००/- इतक्या मानधनावर सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर कंपनीने मंडळाचे सन २०१२-१३ चे वैधानिक लेखापरिक्षण (Statutory Audit) पुर्ण करून तसा अहवाल मंडळास सादर केलेला आहे.<br><br>मे. टी. पी. डब्ले ॲन्ड कंपनी, नागपूर यांनी दिनांक ०७.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंडळाचे सन २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी त्यांच्या नेमणूकीस मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.<br><br>मंडळाच्या सनदी लेखापालांनी सन २०१३-१४ चे लेखे तयार केलेले असून सन २०१४-१५ चे लेखे पुर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे व ते माहे जून २०१७ मध्ये मंडळास प्राप्त होणे अपेक्षित आहे. सदर लेखे येत्या अधिवेशनात विधीमंडळामध्ये ठेवण्यासाठी शासनास लवकरात लवकर सादर |

अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | करणे आवश्यक आहे. तरी सदर सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षाच्या मंडळाच्या लेख्यांचे वैधानिक लेखापरिक्षण (Statutory Audit) करण्यासाठी मे. टी. पी. डब्ले ॲन्ड कंपनी, नागपूर यांच्या नियुक्तीस मुदतवाढ द्यावी किंवा स्वतंत्र दरपत्रक मागवून सनदी लेखापालाची नियुक्ती करावी याबाबत मंडळाच्या निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.<br>**ठराव: सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणाकरीता (Statutory Audit) मे. टी. पी. डब्ले ॲन्ड कंपनी, नागपूर (सनदी लेखापाल) यांच्या नियुक्तीस प्रति वर्ष रु. २.७५ लाख या दराने मुदतवाढ देण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**<br><br>**विषय क्र.४: कामगार प्रतिनिधी श्री अशोक भूताड यांच्या दिनांक १३.०४.२०१७ च्या गुंतवणूकीच्या बैठकीसाठी केलेल्या विमान प्रवासास मान्यता देण्याबाबत.**<br>मंडळाच्या अतिरिक्त निधी गुंतवणूकीबाबत दिनांक १३.०४.२०१७ रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मंडळाचे सदस्य श्री. अशोक भूताड (कामगार प्रतिनिधी) यांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर बैठक तातडीने आयोजित करण्यात आल्यामुळे त्यांनी दिनांक १३.०४.२०१७ रोजी सदर बैठकीस उपस्थित राहण्यासाठी |



अध्यक्ष

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | नागपूर-मुंबई असा विमान प्रवासाची टीकीटे आरक्षण केलेले होते.<br>परंतू सदर बैठक मा. अध्यक्ष यांच्या आदेशानुसार रद्द झाल्यामुळे सदर टिकीटे रद्द करून रद्द केलेल्या टिकीट शुल्काची मागणी श्री. अशोक भूताड (कामगार प्रतिनिधी) यांनी केलेली आहे. तरी सदर मागणी केलेले शुल्क रु. २५९०/- एवढया रक्कमेस मंडळाने विशेष बाब म्हणून मान्यता देणे प्रस्तावित करण्यात येत आहे.<br>**ठराव: कामगार प्रतिनिधी श्री अशोक भूताड यांच्या दिनांक १३.०४.२०१७ च्या गुंतवणूकीच्या बैठकीसाठी केलेल्या विमान प्रवासास मान्यता देण्यात आली.**<br><br>**विषय क्र.५: मंडळमार्फत जिवित नोंदित बांधकाम कामगारांकरीता मंजूर योजनांच्या देखरेखीसाठी (Monitering) व पडताळणी (Evaluation) करीता अनुभवी संस्थेची निवड करणेबाबत.**<br><br>मंडळामार्फत जिवित नोंदित बांधकाम कामगारांकरीता २३ कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर मंजूर योजनांशिवाय दिनांक २८.०२.२०१७ व ०६.०६.२०१७ रोजी नवीन योजनांना मान्यता देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मंडळाच्या |



अध्यक्ष
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| | | मुख्यालय स्तरावर व क्षेत्रीय कार्यालयात मंडळाचे अधिकारी/कर्मचारी नियुक्त केलेले नसल्यामुळे सदर योजनांच्या देखरेख (Monitering) व पडताळणी (Evaluation) करीता कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीस अडचणी येत आहेत. यास्तव मंडळामार्फत कार्यान्वीत व भविष्यात कार्यान्वीत होणाऱ्या योजनांच्या देखरेखी करीता व पडताळणी करीता स्वतंत्र खाजगी अनुभवी संस्थेची नेमणूक करण्याचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे. असे मंडळ सचिव म्हणाले.<br>**ठराव: मंडळमार्फत जिवित नोंदित बांधकाम कामगारांकरीता मंजूर योजनांच्या देखरेखीसाठी (Monitering) व पडताळणी (Evaluation) करीता अनुभवी संस्थेची निवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार शासनमान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहिर केले.

*******************

(सही)

**अध्यक्ष**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**